प्रेसनोट दि. ०८/०७/२०१९

**"गांजा विक्रीस आलेल्या गांज्या तस्करास ०३ किलो ( किं.रु. ६००००/-) गांज्यासह गुन्हे शाखा, युनिट-०४ कडून अटक"**

मा.पोलीस आयुक्त,श्री.डॉ.के.व्यंकटेशम्, पुणे शहर यांनी पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये अंमली पदार्थ विकणा-या व्यक्तिंवर कारवाई करून पुणे शहरामधून अंमली पदार्थाचे समूळ उच्चाटन करणेबाबत पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

सदर आदेशाचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान,युनिट-०४,गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड,पोलीस कर्मचारी शंकर पाटील,राजू मचे,गणेश साळूंके,रमेश चौधर,निलेश शिवतरे, रमेश राठोड व सागर घोरपडे असे येरवडा पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस कर्मचारी रमेश चौधर व निलेश शिवतरे यांना बातमीदारांमार्फत माहिति मिळाली की,येरवडा क्षेत्रिय कार्यालयाचे पुढे,ताडीगुत्या समोरील सार्वजनिक रोडवर एक इसम संशयीतरित्या थांबलेला आहे.सदर माहितीनुसार पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे आदेशान्वये पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड व नमूद स्टाफ यांनी नमूद ठिकाणी छापा मारून इसम नामे **अनिल महादेव जाधव, वय-२५ वर्षे, रा. मु. पेरणेफाटा, रामनगर, गल्ली नं.३, ता .हवेली, जि.पुणे** यास ताब्यात घेवून त्याचे **कब्जातून ३ किलो वजनाचा गांजा किं.रुपये. ६००००/- हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला** असून नमूद आरोपीविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं.५४९/२०१९ एन डी पी सी ॲक्ट कलम-८,२०(ब)(ii)(ब),२९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याने सदरचा गांजा हा कोठून आणला याबाबत पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड हे करीत आहे.

**. सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री.अशोक मोराळे,पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.बच्चनसिंग,पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री.विजय झंजाड, पोलीस कर्मचारी रमेश चौधर, निलेश शिवतरे, गणेश साळूंके, राजू मचे, शंकर पाटील, रमेश राठोड, सागर घोरपडे, सचिन ढवळे, सुहास कदम यांनी केलेली आहे.**

दि.०८/०८/२०१९

(अंजुम बागवान)
पोलीस निरीक्षक
युनिट-०४,गुन्हे शाखा,पुणे शहर

Scanned by CamScanner